MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

## आष्टीत ऐन सणासुदीत रस्त्यावर वाहतूक कोंडी

आष्टी / प्रतिनिधी

शहरातून जाणार्या पंढरपूर - दिंडी महामार्गावरिल अवैध प्रवासी वाहतूक शिरजोर ठरत आहे. परिणामी येथील बसस्थानकातून आतमधून बाहेर जाणाऱ्या व बाहेरुन आत येणाऱ्या बसचालकाने हॉर्न वाजविल्यानंतर अवैध वाहतूकदाराने बसच्या वाहक आणि चालकास शिवीगाळ करण्याचे आजपर्यंत अनेक प्रकार घडलेले आहेत. परंतु याकडे वाहतूक पोलिस मात्र, डोळेझाक का करते असा प्रश्नही सामन्यांना पडला आहे.

परतूर तालुक्यातील आष्टी शहरातून शेगांव - पंढरपूर (दिंडी )महामार्ग गेलेला आहे मात्र मार्गाचे अपूर्ण काम वाहतुकीस अडथळा ठरत आहे. त्यात बसस्थानकात व महात्मा ज्योतिबा फुले शॉपिंग सेंटर मध्ये वाहनासाठी पार्किंग ची व्यवस्था नसल्याने या मुख्य रस्त्यावरच बेशिस्त वाहने लोकं उभी करत आहे. ही अस्तव्यस्त राहणारी वाहने रहदारी करणाऱ्यांना त्रासदायक ठरत आहे. आष्टी हे तालुक्यातील सर्वात मोठे शहर असल्याने येथे परिसरातील नागरिक दैनंदिन कामानिमित्त येत असतात.मात्र या भागात पार्किंगची व्यवस्था नसल्याने या शेगांव - पंढरपूर रस्त्यांवर दोन्ही बाजूंनी बेशिस्त वाहनांमुळे अन् दुतर्फा अतिक्रमणामुळे रस्ता वाहनांनी गिळंकृत केल्याचे दिसून येते.आता तर दिवाळीच्या खरेदीसाठी लोकं मोठ्या प्रमाणात येत असल्याने बेशिस्त वाहनांमुळे कोंडी होत आहे. त्याचा मनस्ताप पादचाऱ्यांसह वाहन व नागरिकांना सहन करावा लागत आहे. शहरातील दिंडी महामार्ग वाहतुकीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. याच मार्गावरून शहरातील नागरिकांची मोठी गर्दी असते. तरीही अवैध वाहतूक करणारे चालक कोणत्याही क्षणी प्रवासी घेण्यासाठी रस्त्यात थांबतात अन् कोणत्याही क्षणी वाहने सुरू करून रस्ता ओलांडतील याबद्दल सांगणे कठीण झाले आहे. याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -४२ | मंगळवार दि.२९ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -42 | TUESDAY DT.29 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |

# काही जरी झालं तरी यंदा क्षीरसागरच आमदार!

**बीड विधानसभेत अपक्षचा नारा दिल्यामुळं जयदत्त क्षीरसागराचं पारड जंड**

## नारायण गडाचा आशीर्वाद जयदत्त क्षीरसागरानाच मठाधिपती महाराजांनी दिला जयदत्त अण्णा आशीर्वाद





**प्रतिनिधी । बीड**

जयदत्त अण्णा अपक्ष संदीप भैया शरद पवारांच्या राष्ट्रवादी कडून तर डॉक्टर योगेश भैय्या यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून केली उमेदवारी दाखल. क्षीरसागरांची तिरंगी लढत तर ज्योती मेटे अनिल जगतापासह अनेक भावी आमदार बीड विधानसभेच्या रिंगणात अपक्ष लढणार.ज्योती मेटे शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये गेल्यामुळे शिवसंग्राम कार्यकर्ते नाराज! शिवसंग्राम च्या नेत्या ज्योतीताई मेटे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी मध्ये प्रवेश केला का युती केली पण आता शरद पवारांपासून ज्योती मेटे दूर जाणार का जिल्ह्यासह राज्याचे लक्ष!

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये आता वेगळं वळण लागलेला आहे क्षीरसागरांच्या बंगल्यापैकी तीनही क्षीरसागर आता बीड विधानसभेच्या तयारीमध्ये आहेत यात जयदत्त क्षीरसागर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरलेला आहे तर संदीप क्षीरसागर यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे उमेदवार डॉ योगेश क्षीरसागर यांनी महायुतीच्या कोट्यातून उमेदवारी अर्ज भरलेला आहे.

तर यावेळी आता शिवसेनेचे शिंदे गटाचे विद्यमान जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी उमेदवारी न मिळाल्यामुळे अपक्ष लढण्याचा निर्णय घेतलेला आहे. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करून संघटनेची युती केली किंवा शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये शिवसंग्राम पक्ष विलीनीकरण केला याला



आता महत्व राहिले नाही ज्योतीताई मेटे ह्या आता अपक्ष निवडणुकीच्या रिंगणामध्ये उतरणार आहेत मनोज दादा जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी दोघेही रवाना झाले असून या ठिकाणी आता बीड जिल्ह्यामध्ये मराठा विरुद्ध ओबीसी असा सामना रंगणार आहे परंतु या ठिकाणी काही जरी झाला तरी क्षीरसागर पैकी एक आमदार होईल अशी चर्चा बीड जिल्ह्यातील जनतेमध्ये ऐकायला मिळत आहे. बीड जिल्ह्यामध्ये सध्या नारायण गडाचे महंत यांनी नारायण गडाचा आशीर्वाद जयदत्त क्षीरसागर यांनाच दिलेला आहे त्यामुळे आमदार म्हणूनच जयदत्त क्षीरसागर यांची वर्णी लागणार आहे असे स्पष्ट सांगितल्यानंतर आता नारायणगडाचा आशीर्वाद मिळाला म्हणजे बीडचे आमदार जयदत्त क्षीरसागर हेच होणार आहेत अशी चर्चा आता ग्रामीण भागातील जनतेमधून ऐकायला मिळत आहे.

**बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये पंकजा मुंडे धनंजय मुंडे बहिण भाऊ एकत्र आल्यानंतर पंकजाताई मुंडे यांनी लोकसभेच्या निवडणुकांमध्ये उतरत असताना महायुतीच्या उमेदवार म्हणून होत्या परंतु अवघ्या काही मतांनी त्यांचा पराभव झाला होता मात्र बीड विधानसभेतून डॉ योगेश क्षीरसागर यांनी मनातून काम केल्यामुळे पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांनी अखेर अनिल दादा जगताप**

**यांची उमेदवारी वरणी न लावता योगेश क्षीरसागर यांची उमेदवारी पक्की करत ए बी फार्म आज दिला योगेश क्षीरसागर यांनी महायुतीच्या कोट्यातून अजित पवारांचे राष्ट्रवादीतून आज उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे येणाऱ्या काळामध्ये तीन क्षीरसागर व मराठा उमेदवार यांच्यामध्ये मोठी लढत होणार आहे ओबीसी विरुद्ध मराठा वाद पेटल्यामुळे बीड विधानसभेचा विषय आता चर्चा बनलेला आहे.**

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मराठा आरक्षणामुळे अनेक ठिकाणी आता वादाला तोंड फुटण्याची दाट शक्यता आहे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आक्रमक पवित्र्याने महायुती सरकारला घाम फुटला आहे यातच आता महाविकास आघाडी व महा युतीच्या उमेदवारांनी उमेदवारी आज वेगवेगळ्या दाखल करण्याची आजची शेवटची उमेदवारी दाखल करण्याची तारीख आहे यात आता मनोज दादा जरांगे पाटील यांनी लढायचं आणि पाडायचं हा निर्णय घेतल्यामुळे अनेकांचे तारांबळ उडाली आहेत अनेक मराठा समाजातील दिग्गज नेत्यांनी मनोज दादांनी पाटील यांच्या पाठिंबाच्या अपेक्षा ठेवलेली आहे येणाऱ्या काळामध्ये मनोज दादा पाटील काय निर्णय घेतात याकडे आता संबंध महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहेत आता मनोज दादा पाटील ज्याच्या पाठीशी भरातील तोच आमदार महाराष्ट्रामध्ये होईल असे चित्र स्पष्ट होत आहे तर बीडमध्ये शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी आज अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे शिवसंग्राम नेत्या व स्वर्गीय विनायकरावजी मेटे यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे या सुद्धा अपक्ष निवडणुकीच्या रिंगणामध्ये उतरले आहेत त्यामुळे बीडची निवडणूक आता मराठा विरुद्ध ओबीसी होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

**अपक्ष चा नारा दिल्यामुळे जयदत्त क्षीरसागर यांचे पारडे जड**

### संदीप क्षीरसागर थोरल्या पवारांकडून तर योगेश क्षीरसागर. धाकट्या पवारांकडून बीड विधानसभेमध्ये लढणार.

आज नारायणगडाचे महंत मठाधिपती यांनी क्षीरसागर यांना बीडचे आमदार जयदत्त अण्णा क्षीरसागरच होणार म्हणून आशीर्वाद दिला आहे याचा एक व्हिडिओ सुद्धा आज सोशल मीडिया वरती व्हायरल होत आहे यामध्ये ग्रामीण भागामध्ये नगद नारायण महाराजांच्या गादीला नारायण गडाच्या मठाधिपती च्या शब्दाला महत्त्व आहे म्हणून जयदत्त क्षीरसागर हे बीडचे आमदार होणार आहेत अशी चर्चा ग्रामीनभागामध्ये जोरदार चर्चा चालू आहे.

**दलित मुस्लिम आणि मराठा हे मतदान आता जयदत्त क्षीरसागर यांना मिळणार आहे कारण मराठा समाजामध्ये ज्योतीताई मेटे यांना शरद पवार यांनी तर शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल जगताप यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उमेदवारी न दिल्यामुळे आता मराठा ओबीसी वादामध्ये पुन्हा एकदा मराठ्यांचे मतदान हे जयदत्त क्षीरसागर यांना पडणार आहेत दलित मुस्लिम मतदान हे आता मुस्लिम उमेदवार कोणत्याच पक्षाने बीड विधानसभेत न दिल्यामुळे आता ते जयदत्त क्षीरसागराच्या पत्त्यावर पडणार आहे त्यामुळे बीडचे आमदार जयदत्त क्षीरसागर आमदार होतील अशी चर्चा चालू झाली आहे.तर महाराष्ट्राचे लक्ष बीड विधानसभेच्या निकालाकडे लागले आहे.**

# प्रयास फाउंडेशन मुंबई व गुरू आनंद महिला प्रतिष्ठाने केली एक हजार कुटुंबाची दिवाळी गोड

**प्रतिनिधी । बीड**

बीड शहरात गेल्या अनेक वर्षापासून गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजसेवेचा अखंड यज्ञ चालवणाऱ्या समाजसेविका सीमा ओस्तवाल यांनी दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी शहरातील अपंग, वंचित, गरीब कुटुंबातील एक सदस्यांची दिवाळी गोड व्हावी म्हणून त्यांना दिवाळी किराणा किट मोफत वाटप केले .प्रयास फाउंडेशन मुंबई आणि गुरु आनंद महिला , प्रतिष्ठानच्या माध्यमातून यावर्षी शहरातील प्रतिष्ठित,नागरिक, व्यापारी यांच्या सहकार्याने एक हजार किरण किट गोरगरीब वंचित, अपंग व्यक्तींना, तसेच गरजू कुटुंबातील सदस्यांना वाटप केले . माँ वैष्णवी पॅलेस या ठिकाणी भव्य दिव्य सभामंडपात हा कार्यक्रम पार पडला.गेल्या अनेक वर्षापासून दिवाळीच्या सणाला गरजू व्यक्तींना मोफत किरण दिला जातो. त्याचप्रमाणे समाजसेवेचा वसा घेतल्या समाजसेविका सीमा ओस्तवाल यांनी यावर्षी विद्यार्थ्यांना ७०००० वह्यांचे वाटप केलेले आहे.एकही गरीब



### वरिष्ठ पोलीस अधिकारी व पत्रकारांच्या हस्ते गरजूंना किराणा किट वाटप

कुटुंबातला मुलगा शिक्षणापासून वंचित राहणार नाही त्यासाठी त्यांनी जिल्हा परिषदेच्या सर्वच शाळेमध्ये जात गेला तीन महिन्यात ७० हजार वह्यांचे वाटप केले आहे. प्रत्येकी २०००० पेन, शॉपनर, स्पेशील, आणि ७० हजार वह्या वाटप केले, अन्नदान हे अनेक वेळा त्यांनी केलेले आहे त्याचप्रमाणे आता वयोवृद्ध वंचित गरीब कुटुंबातील सदस्यांना किरणा कीट मोफत दिल्याने गरजू कुटुंबातील व्यक्तींची दिवाळी गोड होणार आहे.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष. राज्यातील मा पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी डॉ.शेखर पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक मोदिराज साहेब. यांची उपस्थिती होती. तसेच पत्रकार जितेंद्र शिरसाट, श्री रमेशजी घोलप ,पत्रकार.संग्राम धनवे, बालासाहेब फपाळ, नितीन जोगदंड, ज्ञानोबा वायबसे,अभिनेता सुजित चौरे ,विजय पोकळे , यांच्यासह व गुरु आनंद महिला प्रतिष्ठान ची सर्व टीम. यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्र संचालन श्री पाटोळे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री .मनोज ओस्तवाल यांनी केले

# हजारोंच्या उपस्थितीत बदामराव पंडितांची महाआघाडी कडून उमेदवारी दाखल

## महिलांची सुरक्षा वाऱ्यावर ; महायुतीवर सुषमा अंधारे बरसल्या

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई विधानसभा मतदारसंघातून माहविकास आघाडी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाकडून उमेदवारी मिळालेल्या माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी हजारोंच्या उपस्थितीमध्ये आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महिलांची सुरक्षा, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव आणि बेरोजगार सुशिक्षित तरुण यांना वाऱ्यावर सोडणाऱ्या सत्ताधाऱ्यान विरोधात राज्यातली जनता प्रचंड चिडलेली आहे. पक्ष फोडाफोडी करून ५० खोके एकदम ओके म्हणून सत्तेत आलेल्या महायुतीला गाडल्याशिवाय महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनता गप्प बसणार नाही अशा कडक शब्दात समाचार घेत शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे महायुतीवर बरसल्या.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, भारतीय काँग्रेस, समाजवादी पार्टी, शेतकरी कामगार पक्ष आणि मित्र पक्ष या महाविकास आघाडीचे गेवराई विधानसभा मतदारसंघातील उमेदवार बदामराव पंडित यांनी दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या उपस्थितीत बदामराव पंडित यांच्या बंगल्यापासून गेवराई कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केट यार्ड पर्यंत हजारोंच्या उपस्थितीमध्ये विराट रॅली काढून बदामराव पंडितांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी सौ गिरीका भाभी पंडित, सौ अनुरूपाताई पंडित, सौ अजस्मिताताई पंडित यांनी सुषमाताई अंधारे यांचे स्वागत केले. मार्केट यार्ड च्या भव्य मैदानात झालेल्या जाहीर सभेत बोलताना शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे म्हणाल्या की, बदामराव पंडित हे गोरगरीब आणि सामान्यांच्या भावना समजून घेणारा नेता आहेत. म्हणूनच सर्व जाती आणि धर्माचे लोक त्यांना आपला माणूस म्हणून ओळखतात. त्यांच्यामध्ये प्रामाणिकपणा असून सत्तेसाठी शिवसेना सोडून ४० गद्दार गेले परंतु बदामराव पंडित हे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत एकनिष्ठ राहिले. त्यांच्या एकनिष्ठतेचेच फळ म्हणून त्यांना गेवराई विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्या उमेदवारीबाबत शिवसैनिकांपेक्षा विरोधकांना जास्त चिंता वाटत होती कारण बदामराव पंडितांना महाविकास आघाडीची आणि विशेषतः शिवसेनेची उमेदवारी मिळाली तर आपला



पराभव आढळ आहे याची भीती विरोधकांना वाटत होती असे स्पष्ट सांगून सुषमाताई अंधारे म्हणाल्या की, भाजपासोबत सत्तेसाठी जाऊन महायुतीचे सरकार स्थापणाऱ्या सत्ताधाऱ्यांकडून राज्यातल्या जनतेच्या तोंडाला पाणी पुसण्यात आली आहेत. साडेतीन वर्षाच्या मुलींपासून ७० वयाच्या महिलेवर अत्याचार होत आहेत. त्यांचा रक्षण हे सरकार करू शकले नाही. शेतीमालाला भाव देऊ शकले नाही. युवकांच्या हाताला रोजगार आणि नोकरी देऊ शकले नाही. याउलट स्वतःच्या हक्काच्या मागण्या करणाऱ्या आंदोलनकर्त्यांवर लाठीचार्ज, गोळीबार करून अश्रूधुराचे नळकांडे फोडले, वारकऱ्यांवर लाठीचार्ज केला, महिलांवरही काठी उगारणारे हे सरकार राज्यातल्या जनतेच्या डोक्यात बसले आहे. यांना सत्तेवरून उलथून टाकण्यासाठी राज्यातली स्वाभिमानी जनता सज्ज झाली आहे. उद्धव ठाकरे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी बदामराव पंडित यांना मोठ्या मताधिक्याने आमदार करा असे आवाहनही सुषमा अंधारे यांनी केले. बदामराव पंडित म्हणाले की, राज्यातल्या जनतेला न्याय देण्यासाठी महायुती सरकार पूर्ण फेल झाले आहे. त्यामुळे सामान्य जनता त्यांच्यावर नाराज आहे. अगदी त्याचप्रमाणे गेवराई मतदार संघातले राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार जाहीर करताना अमरसिंह पंडित की विजयसिंह पंडित कोण लंगोट बांधणार? यातच ते परेशान आहेत आणि भाजपला सोडचिठ्ठी दिलेले विद्यमान आमदार लक्ष्मण पवार निवडणूक लढणार की नाही लढणार ? कोणत्या पक्षाकडून लढणार? याच चर्चेत अडकले आहेत, असे सांगून गोरगरीब आणि सामान्य लोकांची कामे व्हावेत हीच माझी अपेक्षा आहे शेवटच्या श्वासापर्यंत गरिबांची सेवा मी अविरतपणे करत राहणार असा विश्वास करून यावेळी आपण सगळ्यांनी एकत्र येऊन मतदान करत माझ्या पाठीशी आपले आशीर्वाद उभा करावेत असे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले. याप्रसंगी शिवसेना जिल्हा समन्वयक बाळासाहेब अंबुरे, जिल्हा समन्वयक युधाजित पंडित, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महादेव औटी, उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, विधानसभा संघटक कानिफनाथ नागरे, विधानसभा समन्वयक गणेश चव्हाण, तालुका संपर्कप्रमुख सुरेश बावकर, बीड तालुका प्रमुख गोरख सिंघम, तालुकाप्रमुख अजय दाभाडे, माजी तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे, युवासेना जिल्हा समन्वयक पवन चव्हाण, राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हा अध्यक्ष श्रीनिवास बेदरे, ॲड एम एस इंदानी, माजी सभापती अभयसिंह पंडित, माजी सभापती तुकाराम हराळे, माजी उपसभापती भीष्माचार्य दाभाडे, किसान सेना तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, युवराज डोंगरे, युवासेना उपजिल्हाप्रमुख शेख सिराज, युवासेना तालुकाप्रमुख गोविंद दाभाडे, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, पोपटभाऊ छाजेड यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी सभापती पंढरीनाथ लगड यांनी अतिशय मोजक्या शब्दात बदामराव पंडित यांच्या कार्याविषयी प्रभावी प्रस्ताविक केले. जिल्हा संपर्कप्रमुख पुरुषोत्तम जाधव, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, तालुकाप्रमुख गोरख सिंघम, तय्यब पठाण, यांची समायोजित भाषणे झाली.

# रतन टाटा युवारत्न पुरस्काराने धोंडीबा हातागळे सन्मानित

प्रतिनिधी । तलवाडा

मुंबई, यशवंतराव चव्हाण सेंटर येथे दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ०४:०० वाजता रतन टाटा युवा परिवर्तन पुरस्कार २०२४ रतन टाटा युवारत्न पुरस्कार कार्यक्रम संपन्न झाला. मानवी हक्क अभियानाचे तालुकाध्यक्ष धोंडीबा हातागळे यांना रतन टाटा युवारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम इको फ्रेंडली लाईफ आणि तरुण तगडा भारत या संस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या मागचे उद्दिष्ट तरुण पिढीला प्रोत्साहित करणे आणि सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी प्रोत्साहित




करणे हा होता. हा पुरस्कार ज्यांनी ज्यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये किंवा राजकीय क्षेत्रामध्ये वंचित घटकाला न्याय मिळवून देण्याचे काम केलं आहे अशा लोकांना पुरस्कार देण्यात येतो. मानवी हक्क अभियानाचे तालुकाध्यक्ष धोंडीबा हातागळे यांनी गेवराई तालुक्यामध्ये ऊसतोड कामगार गायरानधारक दलित वंचित आदिवासी व इतर वंचित घटकांना वेगवेगळ्या माध्यमातून न्याय देण्याचे काम मोठ्या प्रमाणात तालुक्यात केल्याचे चित्र दिसतं म्हणून त्यांची दखल रतन टाटा युवारत्न पुरस्कार साठी निवड करून त्यांना सन्मानित करण्यात आलं. हा पुरस्कार पर्यावरण तज्ञ इको फ्रेंडली लाइफ चे प्रमुख पर्यावरण रक्षण आंदोलन व तरुण तगडा भारत चे संस्थापक श्री अशोक एन. जे. यांच्या हस्ते मुंबई यशवंतराव चव्हाण सेंटर येथे देण्यात आला.

# विकास कामांचा आश्वमेध सुरु ठेवण्यासाठी माय बाप जनता मला आशीर्वाद देईल – आ. लक्ष्मण पवार

## एकदम साध्या पध्दतीने आ. लक्ष्मण पवारांनी भरला आपला उमेदवारी अर्ज

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई : गेल्या दहा वर्षा पुर्वी मतदारसंघात असलेली परिस्थिती व आज मतदार संघात झालेला बदल जनतेला माहीत आहे पुर्वी गोरगरीब रेशनकार्ड धारकास राशन मिळत नव्हते पण आमदार म्हणून गेवराई तालुक्यातील राशन वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करीत बायोमेट्रिक प्रणाली सुरु करुन गोरगरीबांना हाक्काचे राशन मिळवुन देण्यासाठी केलेले प्रमाणिक प्रयत्न जनता कधीच विसरणार नाही असा मला विश्वास आसल्याचे आ.लक्ष्मण पवार यांनी म्हटले आहे. मतदारसंघातील लोकप्रिय आमदार



लक्ष्मण माधवराव पवार यांनी आज दि.२८ ऑक्टोबर रोजी एकदम साध्या पध्दतीने आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी शिवराज पवार जे.डी. शहा, राहुल खंडागळे, शिनुभाऊ बेद्रे, धम्मपाल सौदरमल, जमील सेठ, काशिनाथ पवार, आदीच्या उपस्थितीत आ.लक्ष्मण पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे

गेवराई मतदारसंघातील जनतेने मला दोन वेळेस सेवा करण्याची संधी दिलेली आहे या दहा वर्षात प्रमाणीक पारदर्शक दर्जेदार केलेला विकासावर मतदारसंघातील जनता विश्वास व्यक्त करील असा मला विश्वास आसल्याचे आ.लक्ष्मण पवार म्हणाले आहेत. पुढे बोलतांना ते म्हणाले की, मतदारसंघातील जनतेने दिलेल्या दहा वर्षांत रस्ते, जलसिंचनासाठी अनेक बंधारे बांधण्यात आले, वीज वितरण करण्यासाठी अनेक ठिकाणी ३३ के व्ही केंद्र उभारून मतदारसंघातील विजेचा प्रश्न मार्गी लावला आहे, असे प्रश्न मार्गी लावले आहेत तर अनेक गावांत विकासाचे स्तोत्र सुरु आहे तो असाच सुरु ठेवण्यासाठी मतदारसंघातील माय जनतेने मला आशीर्वाद द्यावा असे आव्हान आ.लक्ष्मण पवार यांनी मतदारांना केले आहे यावेळी अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती

# प्रा.आ. केंद्र सुलेमान देवळाचे नवीन पाणी फिल्टर कर्मचाऱ्यांनी केले लंपास




## समाजसेवक परमेश्वर घोडके यांचा आरोप

प्रतिनिधी । आष्टी

बीड जिल्ह्यातील सर्वात मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून अस्तित्वात असणारे, आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील शासकीय कोट्यातून खरेदी केलेले पाणी फिल्टर सह अनेक वस्तू कर्मचारी परस्पर लंपास करीत आहेत. अशी लेखी तक्रार आज सुलेमान देवळा गावातील समाजसेवक श्री. परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी आरोग्य विभागाकडे डॉक्टर सौ. शुभांगी पैठने व डॉक्टर शेख मॅडम यांच्याकडे केली आहे .

सविस्तर माहिती अशी की, सुलेमान देवळा प्राथमिक आरोग्य केंद्रात स्थानिक आरोग्य समितीच्या निधीतून, कागदपत्रे अनेक वस्तू खरेदी केला असून, प्रथम दर्शनी कोणतेही वस्तू आज आरोग्य केंद्रात नाहीत. पाणी फिल्टर विषयी चौकशी केली असता अशी माहिती भेटली की, सदर पाणी फिल्टर दवाखान्यातील एका कर्मचाऱ्यांच्या घरी नेऊन बसवण्यात आले आहे. डॉक्टर पैठणे मॅडम व कर्मचारी क्लार्क/ सुपरवायझर श्री. सानप यांच्या संगमताने, दवाखान्यातील अनेक शासकीय औषधे , खांट, गादी, व अन्य औषधाची बाहेर विकी होते का? हा सुद्धा संशय व्यक्त होत आहे. सदर दोन्ही कर्मचाऱ्याची अनुपस्थिती आसते. व दोन्ही अधिकाऱ्यांचा संगमत असून, प्राथमिक आरोग्य केंद्र सुलेमान देवळा केंद्राचा कारभार राम भरोशे चालू आहे. रुग्णांना स्वच्छ पाणी देण्याचे पाणी फिल्टर जर कर्मचारी घरी वापरत असतील तर जनतेने न्याय मागायचा कोणाकडे हा ही मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. याविषयी जाब विचारण्यासाठी समाजसेवक श्री. परमेश्वर घोडके गेले असता, उद्धटपणाची वागणूक देत, कायद्यात तुम्हाला सुद्धा गुंतू अशी भूमिका कर्मचारी घेत आहेत. संबंधित पाणी फिल्टर नेहणाऱ्या कर्मचारांवर डॉक्टर शुभांगी पैठणे काय कारवाई करनार हे पाहणं अपेक्षित आहे. आरोग्य केंद्राची इमारत नवीन होणे अपेक्षित असताना सुद्धा ति न होता. साहित्य गायब करण्यास कर्मचारीसह गावातील जिम्मेदार नागरिक सक्रिय झाले आहेत.नविन ईमारत बांधकाम होण्यासाठी आमरण उपोषण करणाऱ्यारे श्री. परमेश्वर घोडके वर जर ही वेळ येने खूप खेदांची गोष्ट आहे. आठ दिवसात पाणी फिल्टर दवाखान्यात बसून, संबंधित कर्मचारांवर कारवाई न झाल्यास दि ५/११ /२०२४ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रात सुलेमान देवळा या ठिकाणी लोकशाही पद्धतीने आंदोलन केले जाईल असा इशारा दिलेल्या निवेदनात समाजसेवक श्री. परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी दिला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षामध्ये बीड विधानसभेत बंडखोरी...!

प्रतिनिधी । बीड

राष्ट्रवादी काँग्रेस शप पक्षाचे भटके विमुक्त विभागचे जिल्हा कार्याध्यक्ष दीपक चौगुले यांनी बीड विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी दाखल करायच्या शेवटच्या दिवशी यांनी हा अर्ज दाखल केला. पुण्यामध्ये इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती झाल्या होत्या, त्या मुलाखती खुद्द पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेबांनी घेतल्या होत्या, बीड विधानसभेचे वर्तमान आमदार संदीप भैया शिरसागर हे मुलाखती दिवशी गैरहजर होते. मुलाखत न देताच त्यांना पक्षाने उमेदवारी दिली आहे. त्यामुळे नाराज झालेल्या दीपक चौगुले यांनी



बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केला.

लोकशाहीमध्ये आणि लोकशाही मानणाऱ्या पक्षांमध्ये समान संधीचे पालन व्हायला पाहिजे होते, परंतु तसे न होता, पक्षाची उमेदवारी संदर्भात निहित प्रक्रिया पार न पाडता. उमेदवारी जाहीर करणे, हे पक्ष शिस्तीच्या विरोधातच आहे असे म्हणावे लागेल. परळी मध्ये अचानक पणे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना उमेदवारी मिळते, माजलगाव मध्ये दुसऱ्या पक्षातील लोकांना उमेदवारी मिळते. तर बीडमध्ये मुलाखत न देणाऱ्या उमेदवाराला उमेदवारी मिळते. हा सर्व प्रकार संतापजनक आहे. अशी प्रतिक्रिया दीपक चौगुले यांनी व्यक्त केली.. भटक्या विमुक्तांचा आवाज विधानसभेत जाणे आवश्यक आहे, त्यामुळे मी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अशी प्रतिक्रिया दीपक चौगुले यांनी व्यक्त केली

# आ. प्रकाश सोळंके, मोहन जगताप यांचे उमेदवारी अर्ज दाखल






प्रतिनिधी । माजलगांव

माजलगाव विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दोन प्रमुख पक्षाचे उमेदवार विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीकडून तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे मोहन जगताप यांनी महाविकास आघाडीकडून मंगळवार दि. २९ सोमवार रोजी सकाळी साध्यापणाने उमेदवारी अर्ज दाखल केले. दरम्यान आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी ३१२ अर्ज विक्री झाले दुपारपर्यंत ९० अर्ज दाखल झाले आहेत.आज मंगळवार दि. २९ उमेदवार अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. दुपारपर्यंत ३१२ उमेदवारी अर्ज विक्री झाले आहेत. तर ९० उमेदवारी अर्ज दाखल आहेत. दरम्यान सकाळी ११ वाजता विद्यमान आ. प्रकाश सुंदरराव सोळंके यांनी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस गट शिवसेना शिंदे गट व भाजपा महायुतीकडून आपला शेवटच्या दिवशी ३१२ अर्ज विक्री तर ९० अर्ज दाखल उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत माजी आ.आर टी देशमुख, भाजपाचे तालुकाध्यक्ष अरुण राऊत, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, जयसिंग सोळंके, सभापती जयदत्त नरवडे, संभाजी शेजुळ, प्रताप राजवण, डॉ. मनसबदार, लाटे, नासेर पठाणसह आदींची उपस्थिती होती. तर मोहन जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना राष्ट्रीय काँग्रेस पक्ष महाविकास आघाडीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत माजी आ. बाजीराव जगताप माजी आ. उषाताई दराडे, खा. बजरंग सोनवणे, सहाल चाऊस, अर्जुन गायकवाड, दयानंद स्वामी, कचरू खळगे, इत्यादींची उपस्थिती होती. या दोन्ही प्रमुख तगड्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल साध्या पद्धतीने केला. परंतु यावेळी दोन्ही नेत्यांच्या कार्यकत्यांत उत्साह, जल्लोष मात्र मोठ्या प्रमाणात दिसून येत होता.

# वीस वर्षाच्या वनवासातुन बीड मतदारांना मुक्ती मिळवून देणारा खमक्या चेहरा - पँथर नितीन सोनवणे

## वीस वर्षात बीड मतदारसंघातील रस्ते नाल्या, आरोग्य या विषयाचा विकास

**प्रतिनिधी ।** बीड

शहरातील वाढत चाललेली ट्रॅफिक ची समस्या. पोलीस प्रशासना सह पुढार्यांच्या दुर्लक्ष.? बीड शहरातील अरुंद रस्ते, आणी नियम मायबाप जनतेच्या पदरी पाडुन मिळालेला नाहक त्रास.गेल्या वीस वर्षात आरोग्यासाठी, जिल्हा रुग्णालयातील रुग्णांच्या विषयांचे असंख्य प्रश्न, आणी वीस वर्ष मतदारसंघाचा विकास रोखुन जनतेला या नाग त्रासातून मुक्त करण्यासाठी नितीन सोनवणे वेळोवेळी पुढे आले आहेत.आजपर्यंत आलिशान महालातील सोन्याच्या ताटात खाणाऱ्या; आणि गरीब जनतेला विकासापासून दूर ठेवणाऱ्या पुढार्यांनी, गोरगरिबांसाठी त्यांच्या न्याय हक्कासाठी काय केल. कधी त्यांच्यासाठी रस्त्यावर उतरले का असा प्रश्न वेळोवेळी नितीन सोनवणे यांनी प्रश्न उपस्थित केले व जनहितार्थ समोर आले. त्यामुळे त्यांची बीड मध्ये ज्यास्त पसंती मिळत आहे.

त्यांनी ऊसतोड मजुरांच्या पाल्यांसाठी, ऊसतोड मजुरांचा वनवास संपवण्यासाठी वेळोवेळी आवाज उठवला. ग्रामीण भागातील गोरगरीब लोकांना; त्यांच्या मूलभूत हक्कासाठी शेतकऱ्यांसाठी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ते पुढे आले. मात्र निवडणुकीच्या काळात धनशक्तीच्या माध्यमातून धनशक्तीच्या जोरावर स्वतः आपली स्वार्थी भूमिका घेऊन गावोगावी दारोदारी मोठ्या तोरात मिरवत असणाऱ्यांना मायबाप जनता यावेळी ओळखून आहे. त्यामुळे जनसामान्यातुन संघर्ष करून उद्यास आलेला गरीबा शेतकर्याचे लेकरू मायबाप जनतेच्या लोकाभिमुख मुद्दाना सोडवण्यासाठी. आणि विकास होणाऱ्या मुद्द्यावर घाव घालण्यासाठी हा पँथर नितीन सोनवणे मैदानात उतरला आहे.

सामान्यांच्या विचारांच्या न्याय हक्का साठी मोठा लढा उभारुन प्रस्थापितांच्या विरोधात विस्थापित ऊसतोड कामगारांचा मुलगा मैदानात यावेळी उतरला आहे. यासाठी सुजान नागरिकांनो जनतेसाठी रोडवर उतरून त्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारा खमक्या हा पँथर पट्ट्या लोकाभिमुख मुद्दे घेऊन जनसेवेसाठी मैदानात उतरला आहे. हीच ती वेळ आहे मतदान संघातील जनतेला वीस वर्षाच्या वनवासातून मुक्त होण्याची. त्यामुळे बीड मधून नव चेहरा म्हणून पँथ नितीन सोनवणे चे नाव सध्या जोरदार चर्चेत असल्याचे व त्यांना जास्त पसंती मिळत असल्याची जोरदार चर्चा बीड मध्ये होत असल्याचे समजते आहे.



# उद्या बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक

**प्रतिनिधी ।** बीड

बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यातल्या सहाही विधानसभा कार्यक्षेत्रातील महत्त्वपुर्ण बैठक उद्या दि. ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ : ०० वाजता महिला महाविद्यालय बीड याठिकाणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक व *नुतन जिल्हाध्यक्षांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आलेला असुन जिल्हा काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, काँग्रेस कमिटीशी सलग्न सर्व सेल, विभाग, फ्रंटलचे सर्व पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन बीड तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे यांनी केले आहे.

स्वच्छ प्रतिमा ... सक्षम नेतृत्व... !

# माजलगाव विधानसभेसाठी प्रा.ईश्वर मुंडे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल




## खा.शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत बंडखोरी

**प्रतिनिधी ।** किल्ले धारूर

देशाचे नेते पद्म विभुषण खा.शरदचंद्र पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी पदावरून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात धारूर तालुकाक्षध्य,ओबीसी सेल प्रदेश सरचिटणीस,सेवा निवृत्त अधिकारी सेल राज्य प्रमुख या पदावर पक्षाचे सक्रीय काम करून खा.शरदचंद्र पवार साहेबांचे व पक्षाचे विचार वाडी,वस्ती, तांड्यापर्यंत पोहचवले.सन.२०१९ ला माजलगाव मतदार संघाचा आमदार निवडून आनला.पक्ष फुटल्यानंतर ही निष्ठेने खा.शरदचंद्र पवार साहेबांच्या पक्षातच राहीलेले ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करून जन सामान्यांच्या मनात घर केलेले प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे हे खा.शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस कडून माजलगाव विधानसभा लढण्यास ईच्छूक होते.

मागे सन २०२१ ला छत्रपती संभाजी नगर पदवीधर मतदार संघात उमेदवारी मागणी केलेली होती,२०२४ ला बीड लोकसभा मतदार संघात जनसंपर्क वाढवून बीड लोकसभेच्या उमेदवारीची मागणी केलेली होती.वरील दोन्ही वेळी मला पक्षाने आपला नंतर विचार करू असे सांगून थांबवले. आता सन २०२४ च्या माजलगाव विधानसभा निवडणूकीसाठी पक्षाकडे रितसर उमेदवारीची मागणी करून माजलगाव मतदार संघातील शंभर गावात जन संवाद दौरा करून पक्षाचे कार्य वाढवलेले आहे.माझ्या परिचय पत्राच्या पन्नास हजार प्रति मतदार संघातील सर्व गावांमध्ये वाटप केलेल्या आहेत. या वेळी माजलगाव मतदार संघात माझ्या विषयी मतदारांमध्ये सहानुभूती असून पक्षाने आपणास संधी द्यावी अशी जन भावना होती. या मुळे मी निश्चित निवडणूक जिंकू शकत होतो.परंतू असे न होता मला पक्षाने निवडणूक लढण्याची संधी व तिकीट दिले नाही.

या मुळे मतदार संघातील जनता नाराज झालेली असून तुम्ही अपक्ष निवडणूक लढवावी आम्ही तुमच्या पाठीशी आहेत हा दबाव माझ्यावर वाढत असल्यामुळे मी माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक - २०२४ जनतेच्या विश्वासावर अपक्ष लढवून जिंकणार आहे असे सांगून प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी आज सोमवार दि.२८ क्टोबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता आपला उमेदवारी अर्ज कोणताही गाजा वाजा न करता आई वडील दर्शन,गांजपूर येथील ग्राम दैवतांचे दर्शन घेऊन किल्ले धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,लोकनेते गोरीनाथराव मुंडे साहेब यांच्या चौकात अभिवादन करून साध्या पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी माजलगाव यांचे कडे दाखल केला आहे.

# परळीत शरद पवार गटाचं वापरल मराठा कार्ड

## राजसाहेब देशमुख यांना उमेदवारी

**प्रतिनिधी ।** बीड

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने बीड जिल्ह्यातील परळी मतदारसंघात मराठा कार्ड खेळले आहे विद्यमान पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात शरद पवाराच्या राष्ट्रवादीने राजेसाहेब देशमुख यांना मराठा उमेदवाराला तिकीट देण्यात आले आहे. याशिवाय माजलगाव मतदार संघ शिवाय देखील मोहन जगताप यांना उमेदवारी देण्यात आलीआहे. त्यामुळे प्रकाश सोळंके चा सामना माजलगावात आता शरद पवाराचे उमेदवार मोहन जगताप यांच्याशी होणार आहे .महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी दोनच दिवस शिल्लक अर्ज भरताना असताना राजकीय वातावरण चांगलं तापलं आहे. भाजप राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट शिवसेना शिंदे गट महायुतीचे उमेदवार विद्यमान आमदार प्रकाश सोळंके हे कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता साधेपणाने मोजक्या कार्यकर्त्यांसह व लाडक्या बहिणीची उपस्थित आज दिनांक २९ ऑक्टोबर मंगळवार रोजी शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत यामध्ये मराठा कार्ड वापरल्यामुळे तीन एम एम चे मतदान ही शरद पवारांची खेळी आहे तीन एम कार्ड जर एका जुटीने मतदान झालं तर राजेसाहेब देशमुख हे निवडून येण्याचे चान्सेस आहेत व धनंजय मुंडे यांना ओबीसी पॅटर्न व मराठा समाजाचे ३० टक्के मतदान आणि दोन्ही एम कार्ड जर धनंजय मुंडे यांना चालले तर धनंजय मुंडे यांचा मताचा आकडा सांगता येणार नाही होण्याची शक्यता आहे जर तर तिन्ही एम कार्ड जर मराठा उमेदवार असलेले राजेसाहेब देशमुख यांना व जरांगे पॅटर्न व दलित मुस्लिम यांच्या मताची टक्केवारी वरच या निकालाचा अंदाज लागेल पूर्णपणे राज साहेब देशमुख यांना चालला तर परळीचा निकाल आगळा वेगळा दिसेल अशी शक्यता सामान्य जनतेमधून दिसून येत आहे.




# कुंडलिक खांडे उतरले विधानसभा मैदानात

**प्रतिनिधी ।** बीड

बीड विधानसभा क्षेत्रातील प्रस्थापित पुढार्यांनी कायम जनतेला केवळ विकासाच्या भुलथापाच दिल्या आहेत. विकासाचे कोणतेही व्हिजन त्यांच्याजवळ नाही. केवळ स्वतःचे पुढारपण टिकवण्यासाठी विकासाची नाटके करुन दाखणार्यांना हबाडा देण्यासाठी आपण विधानसभा निवडणूकीच्या मैदानात उतरलो असून जनता जनार्धन नक्कीच आपल्याला आशिर्वाद देईल असा विश्वास मराठासेवक तथा सरपंच, उपरसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी व्यक्त केला. सोमवार दि. २८ रोजी श्री. खाडे यांनी बीड विधानसभेसाठी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला. त्या प्रसंगी ते बोलत होते.

मराठा आरक्षण महायोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या साथीने व सर्वसामान्य जनतेच्या आशिर्वादाने आपण विधानसभा निवडणूक लढवण्यास सज्ज झाल्याचे सांगत कुंडलिक खांडे म्हणाले की, मी एक सर्वसामान्य घरातील युवक असून विकासाच्या माध्यमातून मतदार संघाचा कायापालट करु इच्छीतो आहे. आतापर्यंत प्रस्थापित पुढार्यांनी केवळ आपली घराणेशाही चालवत जनतेला विकासाच्या थापा मारलेल्या आहेत. केवळ समाजात भांडणे लावणे, जर कोणी विकासाचे, जनतेचे प्रश्न मांडत असेल तर त्याच्या विरुध्द कटकारस्थान करुन त्यांना जेलमध्ये डांबणे, गावागावात भांडणे लावणे आदि प्रकारच प्रस्थापितांनी केले आहेत. त्यांच्या या सर्व गोष्टी आपण जनतेसमोर मांडणार असून विकासाचे एक नवे व्हीजन घेवून आपण जनता जनता जनार्धनाचा आशिर्वाद मागत असल्याचे खांडे म्हणाले.





राहुल भैय्या दुबाले यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र पोलिस बॉईज संघटना वडवणी तालुका अध्यक्ष ( युवक आघाडी )पदी पपेश चव्हाण यांची निवड करण्यात आली समवेत आदर्श भैय्या जाधव ( मराठवाडा अध्यक्ष ) विवेक भैय्या थोरात (बीड जिल्हा अध्यक्ष )व मित्र परिवार.

# समाजातील शेतकरी,शेतमजूर,व्यापारी, दीनदलित, ऊसतोड कामगारांसाठी अहोरात्र काम करत आहे

## दहा वर्षानंतर पुन्हा सेवेच्या संधीची अपेक्षा आहे सुरेश धस यांचे मतदारांना भावनिक आवाहन



**प्रतिनिधी ।** आष्टी

राजकारणात प्रवेश केल्यानंतर जामगावचा सरपंच आणि जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष झाल्यावर समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन काम केल्यामुळे जनता जनार्दनाने १९९९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये मला आमदार केले सन २०१४ च्या निवडणुकीमध्ये काही चुका झाल्यामुळे पराभव झाला तरीही शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, हमाल, मापाडी, ऊसतोड कामगार दीन दुबळे, वंचित समाज यांना बरोबर घेऊन अहोरात्र काम करत आहे..

विधान परिषदेमध्ये मध्यंतरी काम केले परंतु विधानसभा सदस्य म्हणून गेली दहा वर्ष काम करण्यास संधी मिळालेली नाही ही संधी आपण आशीर्वाद दिल्यास पुन्हा मिळणार आहे त्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघातील जनतेने सेवेची संधी द्यावी असे भावनिक आवाहन भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवारऊ आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) या महायुतीचे उमेदवार माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले

आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर झालेल्या जाहीर सभेमध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते ते म्हणाले, राजकारणाची सुरुवात करतानाच सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये चांगले दिवस यावेत हाच उद्देश ठेवून आपण राजकारणात आलो असून महाविद्यालयीन जीवनानंतर सरपंच पदी काम करताना शासकीय कामकाज कसे करावे ? लक्षात आले आणि त्यानंतर हरिनारायण जिल्हा परिषद गटातून राज्यात विक्रमी मताने विजयी झालो स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या आशीर्वादाने जिल्हा परिषदेचा उपाध्यक्षपदी काम करण्याची संधी मिळाली आणि त्यातूनच गोरगरीब शेतकरी शेतमजूर यांच्या आशीर्वादामुळे आमदार झालो आपण जनतेचे सेवक असल्यामुळे ही सेवा अहोरात्र म्हणजे वर्षाचे ३६५ दिवस आणि २४ तास करणे हा कर्तव्याचा भाग असतो रात्री अपरात्री संकट काळात जनतेच्या मदतीला धावून जाणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य असते माझा फोन माझ्या उशी जवळ असतो मी कधीही फोन बंद ठेवत नाही त्यामुळे जनतेच्या सतत संपर्कात असतो पहिल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ६६ हजार दुसऱ्या निवडणुकीमध्ये ९३ हजार आणि सन २०१४ च्या निवडणुकीमध्ये १ लाख १९ हजार मते घेऊन देखील पराभूत व्हावे लागले हे दुःख आजही मनाशी बाळगून आहे मध्यंतरी विधान परिषदेचा सदस्य म्हणून काम केले परंतु विधानसभा सदस्य नसल्यामुळे गेली १० वर्षापासून तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, हमाल, मापाडी, व्यापारी, विद्यार्थी यांच्यासाठी अत्यंत कमी काम झाले असून मतदारसंघातील जनतेला याचा त्रास सोसावा लागला आहे मी जिल्हा परिषद मध्ये काम करत असताना सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांची मुले महागडे इंग्रजी शिक्षण घेऊ शकत नाही हे लक्षात घेऊन जिल्हा परिषदेचे शिक्षण दर्जेदार करण्याचा प्रयत्न केला त्याचा परिणाम म्हणून आज अनेक गावोगावी जिल्हा परिषद शिक्षण घेतलेले विद्यार्थी चांगल्या पद्धतीने कार्यरत आहेत

आपण शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले त्यापैकी जुन्या तलावातील गाळ काढणे,गावोगावी पिण्याच्या पाण्याच्या योजना मंजूर केल्या आहेत आष्टी तालुक्यातील क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथील आई साहेब संस्थान अश्वलिंग पिंपळवंडी देवस्थान तसेच इतर अनेक देवस्थानांचा विकास केला आहे राज्यमंत्री म्हणून दीड वर्षाचा कालावधी मिळाला परंतु त्याच कालावधीमध्ये आष्टी पाडताना शिरूर तालुक्यातील फळबागा मोठ्या प्रमाणावर लागवडी करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिल्यामुळे संत्रा उत्पादन वाढ झाली असून त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला फायदा झाला आहे शेतकऱ्यांचे जीवनमान सतत उंचावत जावे यासाठी आपला प्रयत्न असतो असे सांगून ते म्हणाले मागील दहा वर्षांमध्ये आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये सिंदफणा तलावाची उंची वाढवणे, माळेवाडी, रोहतवाडी, ठोंबळ सांगवी, खुंटेफळ साठवण तलाव ही कामे गतीने मार्गे लागली नाहीत तर काही ठप्प आहेत पहिल्या विधानसभा सदस्यांच्या काळामध्येच आपण सीना ते मेहेकरी पाणी सोडणे हा प्रकल्प सुरू व्हावा यासाठी प्रयत्न केले याचे ९७ टक्के काम मीच केले परंतु २०१४ ला पराभव झाला आणि राहिलेले काम तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निधी मंजूर केला आणि योजना सुरू झाली परंतु याचे श्रेय दुसरेच घेत आहेत अशी टिप्पणी करून ते म्हणाले की आता निवडणूक आल्यानंतर काहीजण हालचाल करू लागले आहेत मध्यंतरीच्या कोरोना कालावधीमध्ये आणि बिबट्या च्या दहशतीच्या वातावरणामध्ये आजी-माजी लोकप्रतिनिधी घरात बसून होते आता निवडणूक आल्यानंतर त्यांना लोकांना भेटण्याचे आठवण आली आहे असे सांगून शेतकरी दूध उत्पादकांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाच रुपये प्रति लिटर प्रमाणे अनुदान जाहीर केले तसेच कांद्याचे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान पाहून साडेतीनशे रुपये प्रतिक्विंटल अनुदान याच शासनाने मंजूर केले असल्यामुळे तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना २१ कोटी ७५लाख रुपये अनुदान मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न केला असून आपण स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यासोबत काम केले असल्यामुळे त्यांचे शिकवणीतून सर्वसामान्य जनतेसाठी कसे काम करायचे याचे धडे घेतलेले असून वर्षभर अभ्यास करणारा विद्यार्थी परीक्षेला घाबरत नाही त्याप्रमाणे मी निवडणुकीला घाबरत नाही मात्र परीक्षेमध्ये एक्सलंट कामगिरी गुणवंत विद्यार्थी म्हणून ७५ टक्के पेक्षा मार्क मिळवायचा माझा प्रयत्न सुरू असून या निवडणुकीमध्ये चांगले यश मिळावी

# गेवराई मतदारसंघात माझ्या दहा वर्षाच्या कामाचे मोजमाप करा

## सामान्य माणसाचा तळतळाट लागेल असे वागलो नाही - आ. लक्ष्मण पवार

**प्रतिनिधी । बीड**

गेवराई : मतदारसंघातील रस्ते, पाणी आणि वीज, या तीन महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष देऊन, हे अत्यावश्यक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.दहा वर्षात, ना टक्केवारी घेतली, ना कुणा विरोधकांना जाणीवपूर्वक त्रास दिला. सर्व सामान्य माणसाने दिलेल्या आमदारकीचा उपयोग केवळ मतदारसंघातल्या विकास कामासाठी उपयोगात आणली. कुणाचा ही तळतळाट लागेल, असे एक ही काम मी कधीही केले नाही. त्यामुळे, कार्यकर्त्यांच्या पाठबळावर आणि सर्व सामान्य माणसाच्या पुण्याईवर अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात आहे. आता, मायबाप जनतेनेच न्याय द्यावा, असे भावनिक आवाहन आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे बोलताना केले. दरम्यान, गेवराई मतदारसंघातल्या ग्रामीण भागातील अंधार दूर व्हावा म्हणून, ८८ कोटी रू च्या लाईटच्या योजना मंजुर करून आणल्यात, अशी माहिती ही आमदार पवार यांनी यावेळी बोलताना दिली. रविवार ता. २७ रोजी गेवराई मतदारसंघात बुथ प्रमुखांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते. व्यासपीठावर शामबापु पवार, शिवराज पवार, ज्येष्ठ नेते सुरवसे काका, गंगाधर घुमरे, सतिष पाटील, सुंदर चव्हाण, दुषंत डोगरे, जे.डी. शहा, जान मोहम्मंद बागवान, देविदास फलके, शिवराज पवार, सुशील जवंजाळ, भगवान घुबार्डे, राहुल खंडागळे,राजेंद्र राक्षसभुवनकर, दादासाहेब गिरी, सतिष दाभाडे,यांची उपस्थिती होती.

आमदार लक्ष्मण पवार म्हणाले की, गेल्या दहा वर्षात गेवराई मतदार संघातील जनतेची सेवा करताना प्रामाणिक प्रयत्न करून ग्रामीण भागातील प्रत्येक गावात विकास कामे केली आहेत. परंतु , राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता मी या राजकारणापासून दूर राहाव म्हणून मी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आपल्या आग्रहाखातर मला पुन्हा या निवडणुकीच्या मैदानात यावे लागले आहे. मागील काळात केलेली विकास कामे प्रामाणिक कार्यकर्ता अन गोरगरीब जनता हीच आपली ताकद असून याच ताकदीच्या जोरावर आपण अपक्ष उमेदवार म्हणून या निवडणुकीच्या मैदानात उतरलो असून येत्या निवडणुकीत पुन्हा एकदा आपण मला संधी देताल असा विश्वास आ. पवार यांनी व्यक्त केला

मी, पक्ष सोडला असला तरी आपल्या तालुक्यातील जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही. गेल्या दहा वर्षात आपण तालुक्यातील गावागावात विकासाची कामे केली. आज तालुक्यातील असे एकही गाव नाही जिथे आपले विकास काम नाही आणि याच विकास कामाच्या जोरावर आपण पुन्हा एकदा पंडित मुक्तीचा नारा देऊन तुमच्यासाठी या विधानसभा निवडणुकीच्या मैदानात अपक्ष उमेदवार म्हणून उतरत आहे. आपण अपक्ष जरी असलो तरी या मतदार संघातील गोरगरीब मायबाप जनता व आनेक अदृश्य शक्ती आपल्या सोबत आसून हा मतदार संघ आपण कोणाच्या ताब्यात जाऊ देणार नाही म्हणून, आपण सर्वांनी पुन्हा एकदा ताकतीने कामाला लागा विजय आपलाच. असे आवाहन ही त्यांनी केले

यावेळी प्रकाश सुरवसे,गंगाधर घुमरे, युवा नेते शिवराज पवार, देविदास फलके, शिनुभाऊ



बेदरे, जेडी शहा, सतीश पाटील, दुशंत डोंगरे, महेश चेके, ऍड.सुरेश पवार, सुंदर चव्हाण,

यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून पुन्हा एकदा आ. लक्ष्मण पवार यांना विधानसभेत पाठवू असा विश्वास दिला. या बैठकीला सर्व पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





कळंब- अंबाजोगाई रोडवर आंतरजिल्हा स्थिर सर्व्हेक्षण पथक नेमून महामार्गावरील वाहनांची तपासणी करण्यात येत असून सदर ठिकाणी महसूल व पोलीस विभागांचे संयुक्त पथक २४ तास कार्यरत आहे.

आज दि. २८/१०/२०२४ रोजी दुपारी १५.२० वा. चे सुमारास वाहन तपासणी करत असताना पथकास कृष्णा तुकाराम कोल्हे व बळीराम त्रिंबक कोल्हे दोघे रा. नायगाव, ता. केज, जि. बीड हे दोघेजण स्कॉर्पिओं वाहन क्र एम एच ४४ झेड १५६३ मधून अवैध दारू वाहतूक करत असताना मिळून आले. सदर वाहनात एकुण ३५,५२०/- रूपयांची विदेशी दारूचे व बिअरचे एकुण ०५ बॉक्स मिळून आलेले असून सदरबाबत युसूफ वडगाव पोलीस ठाणे येथे मद्यनिषेध कायदयान्वये गुन्हा नोंदवण्यात आलेला असून सदर गुन्हयात स्कॉर्पिओ वाहनासह एकूण १०,३५,५२०/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदरची कामगिरी स्थिर सक्षण पथकातील पोहवा १४८३ सत्यपाल कांबळे, पोशि/९१६ अविनाश मोकाशे, पोशि १९१४ पठाण, श्री एम. पी. बोधीकर, श्री आर के. हारे, श्री यु. ए. माळी यानी केली.

# भारतीय संस्कृतीत गोमातेला अनन्यसाधारण महत्त्व - राजेंद्र मस्के

## कै. तुकाराम गुरुजी गो शाळेत वसू बारस उत्साहात साजरी..!

**प्रतिनिधी । बीड**

आज गोवत्स द्वादशी अर्थात वसू बारस. आजपासून दिवाळी सुरू होते. भारतीय संस्कृतीत गाईला मातेचे स्थान असून, कृतज्ञतेच्या भावनेतून गाय आणि वासरू यांची पूजा केली जाते. प्रेम आणि वातसल्याचे प्रतीक वसू बारस निमित्ताने शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी मित्र, परिवारासह कै. तुकाराम गुरुजी गोशाळेत गाय वासरांचे विधिवत पूजन,व गायींना गोग्रास देऊन, वसू बारस उत्साहात साजरी केली.

गोमातेला हिंदुस्थानात अनन्यसाधारन महत्त्व आहे. नुकताच राज्यात सरकारने कॅबिनेटच्या बैठकीत देशी गायींना राज्य मातेचा दर्जा देण्यात आला आहे. ही आनंदाची बाब आहे. गोमाता सात्त्विक असल्याने सर्वांनी या पूजनाद्वारे तिच्या सात्त्विक गुणांचा स्वीकार करावा, असे म्हटले जाते. सत्त्वगुणी, म्हणजेच आपल्या सहवासाने दुसर्याला पावन करणार्या, आपल्या दुधाने समाजाला बलिष्ठ करणार्या, आपले अंग-प्रत्यंग अर्पण करून समाजाला उपयोगी पडणार्या, शेतीला आपल्या शेणाद्वारे खत देऊन पौष्टिकत्व आणणार्या, शेतीला उपयुक्त अशा बैलांना जन्म देणार्या गोमातेचे या दिवशी पूजन करतात. ज्या ठिकाणी गोमातेचे संरक्षण, संवर्धन होऊन तिला पूज्यभाव



देऊन तिचे पूजन होते, त्या ठिकाणी ती व्यक्ती, तो समाज, ते राष्ट्र भरभराटीस आल्याशिवाय राहत नाही, असे सांगितले जाते. अशा गोमातेचे प्रथम तिच्या वत्सासहित पूजन करून दीपोत्सवाला सुरुवात होते. गोमातेचे जीवन खऱ्या अर्थाने परोपकारी असून, तिच्या अस्तित्वामुळे मानवी जीवनाला समृद्धी लाभते. म्हणून भारतीय संस्कृतीत गोमातेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.अशी प्रतिक्रिया शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी यावेळी दिली.

# प्रामाणिकपणे विकासकामे केली आता पुन्हा संधी द्या : आ. मुंदडा

**प्रतिनिधी । अंबाजोगाई**

भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, एसआयपी व इतर मित्र पक्ष महायुतीच्या अधिकृत उमेदवार आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी २८ ऑक्टोबर रोजी केज तहसील कार्यालयात सहकाऱ्यांसह जाऊन अत्यंत साध्या पद्धतीने आपला केज विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रारंभी केज विधानसभा मतदारसंघासाठी भाजप महायुती तर्फे उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी सोमवारी सकाळी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांच्या गोपीनाथ गड (परळी वैजनाथ) या स्मृतीस्थळी नतमस्तक होत अभिवादन केले. तसेच उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी केज विधानसभा मतदारसंघाच्या भाग्यविधात्या स्वर्गीय डॉ. विमलताई मुंदडा यांच्या चनई (अंबाजोगाई) येथील स्मृतिस्थळी नतमस्तक होत अभिवादन केले. केज तहसील कार्यालयात सहकाऱ्यांसह जाऊन अत्यंत साध्या पद्धतीने आपला २३२ केज विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आ. नमिता अक्षय मुंदडा यांच्यासोबत ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा, भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे जिल्हाध्यक्ष ऍड. राजेश्वर चव्हाण आदींसह महायुतीतील घटक पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी सांगितले की, आशीर्वाद जनतेचा, आणि वसा केज विधानसभेच्या प्रगतीचा घेऊन आम्ही काम करीत आहोत. भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, आरपीआय (ए), एसआरपी व इतर मित्र पक्ष महायुतीच्या २३२ केज विधानसभेच्या अधिकृत उमेदवार म्हणून मी नमिता मुंदडा आज रोजी केज विधानसभेतील जनतेच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा निवडणूक लढविण्यासाठी साध्या पद्धतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. केजच्या जनतेने २०१९ मध्ये मला सर्वप्रथम आमदार केले मिळालेल्या संधीचे मी विकास कामे करून सोने करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. मागील पाच वर्षात आम्ही जनतेसाठी पूर्ण वेळ उपलब्ध राहिलो. या काळात आम्ही जनतेची सेवा केली. पाच वर्षे संपली आहेत. आम्ही परीक्षेसाठी पुन्हा नव्याने सज्ज झालो आहोत. आम्हाला विश्वास आहे. की, जनता आम्हाला या



परीक्षेत ही पुन्हा उत्तीर्ण करेल, जनता आम्हाला परत एकदा पाच वर्षांसाठी निवडून देईल. सगळ्या समाजाला न्याय मिळाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. जनता आम्ही केलेल्या विकासकामांना समोर ठेवून नक्कीच आम्हाला मतदान करतील. आम्ही आरपीआय सह सर्वांना सोबत घेऊन निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. विकास हाच आमचा मुख्य मुद्दा आहे. आम्ही पाच वर्षांत सातत्यपूर्ण जनसंपर्क ठेवला आहे. मूलभूत सुविधा पुरविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. या पाच वर्षांत जे करता आले नाही. ते पुढील पाच वर्षांत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू असा विश्वास माजी आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी व्यक्त केला. यावेळी महायुतीच्या सर्व पक्षाचे नेते,पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





**प्रतिनिधी । कडा**

बीड येथे आज दिनांक २८ सोमवार रोजी आम आदमी पार्टीची बैठक माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक बीड येथील जिल्हा संपर्क कार्यालय येथे संपन्न झाली या बैठकीमध्ये येणाऱ्या विधानसभा निवडणुका व पक्षाची भूमिका यावरती चर्चा करण्यात आली त्याच अनुषंगाने आष्टी तालुकाध्यक्ष पदी प्राध्यापक सुहास चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली व सर्व कार्यकर्त्यांनी पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, मार्गदर्शक प्रा.राम बोडखे सर युवा नेते स्वप्निल पोटे, रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख दत्ता सुरवसे बीड तालुका संघटन मंत्री सुरेश जाधव संतोष चौधरी सह आदि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## चला परिवर्तन घडवूया

केज विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून फॉर्म दाखल करताना केज विधानसभा मतदारसंघाच्या नेत्या माजी आमदार संगीता ताई ठोंबरे विजयप्रकाश ठोंबरे राजेश भाऊ वाहुळे दीपक भैय्या शिंदे

# बीड विधानसभा मतदारसंघातून बळीराम गवते यांनी भरला उमेदवारी अर्ज

**प्रतिनिधी । बीड**

बीड विधानसभा मतदारसंघात वर्षानुवर्षे मोजक्याच प्रस्थापित कुटूंबांची सत्ता असून प्रस्थापितांच्या सत्तेला सुरूंग लावण्यासाठी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि आदेशानुसार बळीराम गवते यांनी सोमवार दि.२८ ऑक्टोबर रोजी साध्या पध्दतीने उमेदवारी अर्ज दाखल केला. बीड मतदारसंघात अनेक वर्षांपासून काही मोजक्याच घराण्यांची सत्ता असून याच घराण्यांनी मतदारसंघ विकासापासून दूर ठेवलेला आहे. शिवाय मराठा आरक्षणाचा विषय सोडविण्यासाठी कोणीही प्रयत्न केले नाहीत. उलट आरक्षणात खोडा घालण्याचे पाप येथील प्रस्तापितांनी केलेले आहे. दरम्यान, मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आता मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी राजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला असून जिल्ह्यातील सर्वच मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे आदेश जरांगे पाटील यांनी दिलेले आहेत.या आदेशाप्रमाणे बळीराम गवते यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशाप्रमाणे आपण उमेदवारी अर्ज





दाखल केला असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, बळीराम गवते यांचे वडील बबनराव गवते हे ३५ वर्षांपासून प्रस्तापितांविरूध्द लढत आहेत. त्यांनी विस्तापितांची मोट बांधून जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये प्रस्तापितांची सत्ता काढून घेतलेली होती. बीड मतदारसंघात गवते पिता-पुत्रांचा मोठा जनसंपर्क असून बळीराम गवते हे महाराष्ट्राची धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गडाचे विश्वस्त आहेत. शिवाय त्यांचा मतदारसंघात मोठा मित्र परिवार सोबतीला आहे. नारायण गड येथे झालेल्या दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी त्यांनी केलेली धावपळ लाखो भाविक भक्तांनी पाहिलेली आहे. समाजाप्रती असलेली तळमळही त्यांनी कायम आपल्या कामातून दाखवून दिलेली आहे.गवते यांची उमेदवारी प्रस्तापितांसाठी आव्हान ठरणार आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT